# बृहन्मुंबई महानगरपालिका
## करनिर्धारण व संकलन खाते
### जाहिरात
**क्र.कवसं/1917/एमसी/2024-25 दि.16.09.2024**

मान. महानगरपालिका आयुक्त यांच्या मंजुरी क्र.एमजीसी/एफ/3532 दि.11.06.2024 नुसार, बृहन्मुंबई महानगरपालिकेतील **'करनिर्धारण व संकलन'** खात्याच्या आस्थापनेवरील गट-क मधील **"निरीक्षक"** या संवर्गातील खालील तक्त्यात नमूद केलेली **178** रिक्त पदे, ऑनलाईन अर्ज मागवून, ऑनलाईन वस्तुनिष्ठ परीक्षा घेऊन सरळसेवेने भरावयाची आहेत. सदर पदासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या **https://portal.mcgm.gov.in/for prospects/careers-All/Recruitment/Assessment & Collection** या संकेतस्थळावर प्रस्तृत जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता/पात्रता धारण करीत असलेल्या उमेदवारांकडून ऑनलाइन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत असून, त्यासाठी उमेदवारांनी **"निरीक्षक पदाकरीता ऑनलाईन अर्ज"** या लिंकवरुन ऑनलाईन पद्धतीने अर्ज विहित मुदतीत सादर करावेत.

**"निरीक्षक"** संवर्गातील पदासाठी ऑनलाइन पद्धतीने अर्ज सादर करण्यापूर्वी उमेदवारांनी स्वत: खात्री करावयाची आहे की, ते अर्ज करीत असलेल्या पदासाठी विहित अर्हता/अटींची पूर्तता करीत असून सदर पदाकरिता ते पात्र आहेत.

**ऑनलाइन अर्ज करण्यासाठी उमेदवाराकडे नित्य वापरात असलेला वैध (Valid) ई-मेल आयडी असणे आवश्यक आहे**. भरती प्रक्रिया परीक्षेचे प्रवेशपत्र तसेच इतर माहिती वेळोवेळी ऑनलाइन पद्धतीने देण्यात येणार असल्याने, भरती प्रक्रियेच्या पूर्ण कालावधीमध्ये सदर ई-मेल आयडी वैध राहणे आवश्यक आहे.

सरळसेवेने भरावयाच्या **"निरीक्षक"** संवर्गातील पदांचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे:-

| | | |
|---|---|---|
| **पदाचे नाव** | : | **'निरीक्षक'** |
| **वेतनश्रेणी (सुधारीत)** | : | **स्तर - M 17 - रु. 29,200-92,300** |
| **भरावयाच्या रिक्त पदांची संख्या** | : | **178** |
| **गट** | : | **'क'** |

**(1) सरळसेवा पध्दतीने ''निरीक्षक'' या संवर्गाची भरावयाची रिक्त पदे.**

**(अ) सरळसेवा पध्दतीने "निरीक्षक" या संवर्गाची भरावयाची रिक्त पदे.**

| तपशील | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | सा.शै.मा.व. | आ.दु.घ. | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण भरावयाची पदे | 11 | 3 | 3 | 4 | 2 | 0 | 0 | 32 | 18 | 18 | 87 | **178** |

**(ब) उपरोक्त रिक्त पदांचे प्रवर्गनिहाय सामाजिक व समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र. | समांतर आरक्षण | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | सा.शै.मा.व. | आ.दु.घ. | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | सर्वसाधारण | 3 | 2 | 2 | 2 | 1 | 0 | 0 | 9 | 6 | 6 | 29 | **60** |
| 2 | महिला (30%) | 3 | 1 | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 10 | 5 | 5 | 26 | **53** |
| 3 | माजी सैनिक (15%) | 2 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 5 | 3 | 3 | 13 | **27** |
| 4 | प्रकल्पग्रस्त (5%) | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 1 | 1 | 4 | **9** |
| 5 | भूकंपग्रस्त (2%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 2 | **3** |
| 6 | खेळाडू (5%) | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 1 | 1 | 4 | **9** |
| 7 | अंशकालीन पदवीधर (सुशिक्षित बेरोजगार)(10%) | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 3 | 2 | 2 | 9 | **17** |
| 8 | **एकूण** | **11** | **3** | **3** | **4** | **2** | **0** | **0** | **32** | **18** | **18** | **87** | **178** |
| 9 | अनाथ मुलांसाठी (1%) (178 x 1% = 2 पदे) | परिपत्रक क्र.एमबीसी/9476, दि.26.04.2023 सोबतचा महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. अनाथ-2022/प्र.क्र.122/का-03, दि.06.04.2023 अन्वये प्राप्त निर्देशानुसार, 178 पदांपैकी **संस्थात्मक प्रवर्गाकरीता 01 पद व संस्थाबाह्य प्रवर्गाकरिता 01 पद अशी 02 पदे आरक्षित होत आहेत.** | | | | | | | | | | | |
| 10 | दिव्यांगांसाठी (4%) (178 x 4% = 7 पदे) | परिपत्रक क्र.एमबीसी/4270, दि.11.07.2019 संलग्नित शासन निर्णय क्र. दिव्यांग 2018/प्र.क्र.114/16-अ, दि.29.05.2019 अन्वये **07 पदे आरक्षित होत आहेत. (गट-अ – 02, गट-ब – 02, गट-क – 02, गट-ड/गट-ई – 01)** | | | | | | | | | | | |

★ उपरोक्त नमूद सामाजिक आरक्षणामधील वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क) व भ.ज.(ड) हे प्रवर्ग आंतरपरिवर्तनीय आहेत.

★ अधिसंख्य पदावर सेवा वर्ग करण्यात आलेली "निरीक्षक" संवर्गातील 04 पदे रिक्त पदांमध्ये समाविष्ट आहेत.

**(क)"निरीक्षक" या संवर्गातील पदाकरिता दिव्यांगासाठी एकूण 07 पदे आरक्षित असून सदर पदाकरिता अर्ज करणा-या उमेदवाराने, खालील नमूद दिव्यांग प्रकार, शारीरिक पात्रता व पदाची जबाबदारी आणि कर्तव्ये विचारात घेऊन अर्ज करणे आवश्यक आहे.**

| संवर्ग | भरावयाची पदे | दिव्यांग प्रकार | | | | | शारीरिक पात्रता | जबाबदारी आणि कर्तव्ये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | (गट-अ) अंध / अंशतः अंध | (गट-ब) श्रवण शक्तीतील दोष | (गट-क) चलनवलन विषयक विकलांगता | (गट-ड) मानसिक अपंगता | (गट-ई) एकाधिक अपंगाचा समावेश | | |
| **निरीक्षक** | **07** | **B= Blind** (अंध)<br>**LV= . Low Vision** (अल्पदृष्टी) | **D=Deaf** (कर्ण बधिरता)<br>**HH= Hard to Hearing** (ऐकू येण्यातील दुर्बलता) | **OA= One Arm** (एक हात, अस्थिव्यंगता)<br>**BA = Both Arms** (दोन्ही हात अस्थिव्यंगता)<br>**OL= One Leg** (एक पाय अस्थिव्यंगता)<br>**BL= Both Leg** (दोन्ही पाय अस्थिव्यंगता)<br>**OAL= One Arm and One Leg** (एक हात आणि एक पाय अस्थिव्यंगता)<br>**CP= Cerebral Palsy** (उन्माद पक्षाघात)<br>**LC= Leprosy Cured** (कुष्ठरोग)<br>**Dw= Dwarfism** (शारीरिक वाढ खुंटणे)<br>**AAV= Acid Attack Victims** (आम्ल हल्लाग्रस्त)<br>**Mdy= Muscular Dystrophy** (स्नायू विकृती) | **MI= Mental Illness** (मानसिक आजार) | **MD involving (a) to (d) above =Multiple Disabilities involving** ( ए ते डी मधील एकाधिक अपंगाचा समावेश) | S=Sitting- (बसणे)<br>ST=Standing (उभे रहाणे),<br>W=Walking (चालणे),<br>BN=Bending (वाकणे)<br>RW=Reading & Writing ( वाचणे आणि लिहिणे)<br>SE=Seeing (पाहणे)<br>H=Hearing (ऐकणे)<br>C=Comunication (संभाषण कौश्यल्य) | 1. मालमत्तांचे करपात्र मूल्य निश्चित करण्याच्या/ सुधारण्याच्या दृष्टीने मालमत्तांचे नियतकालिक निरीक्षण घेणे तसेच रिक्ततेची पडताळणी करण्याकरिता मालमत्तांचे निरीक्षण करणे, अन्य खात्यांकडून प्राप्त झालेल्या संदर्भावर स्थळ निरीक्षणांती अहवाल तयार करणे व त्याअनुषंगाने येणारी अन्य कामे पार पाडणे.<br>2. मालमत्तांचे करनिर्धारण व मालमत्ता कर तसेच शासकीय करवसुलीच्या संदर्भात मनपा आयुक्तांनी विभाग निरीक्षकास मुंबई महानगरपालिका अधिनियमानुसार प्रत्यायोजित केलेले अधिकार वापरणे, तसेच कर्तव्ये पार पाडणे.<br>3. सर्व देयके, मागणीच्या सूचना, दंडाच्या सूचना, जप्तीच्या अनुसूची व पूर्वसूचना बजावणे व संबंधित कामे.<br>4. गाठावयाचे उद्दिष्ट विचारात घेऊन मालमत्ता कर वसूल करणे.<br>5. कार्यपध्दतीनुसार क्षेत्रपुस्तिका व अन्य नोंदवह्या ठेवणे व पत्रव्यवहार त्वरेने निकालात काढणे.<br>6. वरिष्ठांच्या सूचनानुसार, अपील, वाद, लिलाव विक्री, वाद मिटविणे, इत्यादी कामाकरिता न्यायालये, कार्यालये व अन्य ठिकाणी आवश्यकतेनुसार उपस्थित राहणे.<br>7. प्रतिवर्षी हिशोबाचा मेळ घालणे व मालमत्ता कराच्या थकबाकीच्या नोंदवह्या ठेवणे.<br>8. महानगरपालिकेच्या निवडणुका व तत्संबंधी कामे करणे.<br>9. भांडवली मूल्याधारित कर प्रणाली संबंधीत विभागस्तरावरील कामे.<br>10. उमेदवार योग्य ती सॉफ्टवेअर साधने आणि उपकरणे यांच्या सहाय्यासह ग्राह्य धरण्यात येईल. |
| **एकूण** | **07** | **02** | **02** | **02** | **01** | | - | - |

**★परिपत्रक क्र.एमबीसी/3976 दि.10.04.2024 संलग्नित शासन निर्णय क्र.दिव्यांग 2019/प्र.क्र.251/दि.क.2 दि.29.02.2024 मधील निर्देशानुसार, शासन शुध्दीपत्रक क्र. दिव्यांग-2024/प्र.क्र.15/दि.क.2 दि.04.06.2024 अन्वये Locomotor Disability या अस्थिव्यंग प्रकारामध्य Spinal Defomity (SD) and Spinal Injury (SI) without any associated neurological/limb dysfunction हा स्वतंत्र उपप्रकार समाविष्ट करण्यात आला आहे.त्यानुसार शासन सेवेतील जी पदे अस्थिव्यंग (Locomotor Disability) प्रवर्गांतर्गत OA,OL,BA BL,OAL,BLOA व BLA या दिव्यांग प्रवर्गासाठी सुनिश्चित करण्यात आलेली आहेत, अशी सर्व पदे Spinal Defomity (SD) and Spianl Injury (SI) without any associated neurological/limb dysfunction या स्वतंत्र उपप्रकारांसाठीसुध्दा सुनिश्चित राहतील.**